देशोन्नती दि 10/02/2023

# पोलिस वेळीच पोहचल्याने सिडकोत जबरी चोरीचा प्रयत्न फसला

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ अर्धी रात्र होण्यापूर्वीच एका ऑटोवर दरोडा टाकून त्यातील प्रवाशांना लुटण्याचा प्रयत्न ८ फेब्रुवारी रोजी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास सिडको येथील मुख्य मार्गावर घडला. यामध्ये चाकुहल्ला केल्याने ऑटोतील प्रवाशी जखमी झाला असून दरोडा प्रतिबंधक पथक वेळीच घटनास्थळी पोहचल्याने पुढील मोठा अनर्थ टळला. यामध्ये पोलिसांनी बुलेट जप्त करून एकास ताब्यात घेतले. तर दोघेजण फरार होण्यात यशस्वी झाले.

सिडको संभाजी चौकाकडून ऑटो क्र. एम.एच.२६ - बी.डी.०९३३ मधून काही प्रवाशी लातूरफाटाच्या दिशेने जात होते. सदर ऑटो ८ फेब्रुवारी रोजी रात्री अंदाजे १०.३० वाजताच्या सुमारास या मार्गावरील स्मशानभूमी कमानीसमोर आला असता समोरून बुलेट क्र. एम.एच.२६ - सी.बी.७७३९ वर आलेल्या तिघांनी ऑटोसमोर बुलेट उभी करून ऑटो थांबवून त्यातील प्रवाशांना चाकूचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न केला. यावेळी ऑटोतील एका प्रवाश्याने प्रतिकार केला असता त्याच्या गळयावर चाकूने हल्ला करून गंभीर जखमी केले. यावेळी चोरट्यांनी ऑटोवर मोठा दगड मारण्याचा प्रयत्न केल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले. याचवेळी घटनास्थळी दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग करणारे पोलिस पथक योगायोगाने पेट्रोलिंग करत येताच पथकाला पाहून दोघेजण फरार झाले. पोलिस पथक वेळीच घटनास्थळी पोहचले नसते तर मोठा अनर्थ होऊ शकला असता हे नक्की. यावेळी पथकाने बुलेट जप्त करून आरोपी मुद्दसिर मुनवर शेख यास ताब्यात घेतले. सदर पथकात दिलीप श्रीमनवार, बालाजी वाघमारे, पोहेकॉ रामोड, वाहन चालक मुजिबोद्दीन यांच्यासह ग्रामीण ठाण्याचे पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होता. तर फरार झालेल्या दोघांचा पोलिस शोध घेत आहेत. या प्रकरणी शेख मैनोद्दीन शेख राजेसाब यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि. राजेश डाकेवाड हे करीत आहेत.

## दरोडा प्रतिबंधक पथकाने बुलेटसह एकास घेतले ताब्यात








### मोटारसायकल, दरोडा पेट्रोलिंग ठरतेय लाभदायी

पोलिस अधीक्षक पदाची सूत्रे स्विकारल्यानंतर श्रीकृष्ण कोकाटे यांनी गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणेला जागे केले. गल्ली बोळातुन धावण्यासाठी मोटारसायकल पेट्रोलिंग सुरू केल्याने आता पोलिस रस्त्यावर दिसू लागले आहेत. तसेच दरोडा प्रतिबंधक पथकालाही तेजी आणली आहे. या सर्व वाहनांवर पोलिस अधीक्षक कार्यालयातील नियंत्रण कक्षातून नियंत्रण ठेवल्या जात आहे. या पेट्रोलिंगमुळे अनेकांचे प्राण वाचत आहेत हे सिडकोत घडलेल्या घटनेवरून दिसून येत आहे.